CIDCO
WE MAKE CITIES

गुरुवार, दि. २९ मे २०२५ सामना

# नवी मुंबई विमानतळावरून ऑगस्टमध्ये पहिले इंडिगोचे विमान उडणार



## दररोज १८ उड्डाणे

## १५ शहरांना जोडणार

## ऑगस्टमध्ये उद्घाटन

नवी मुंबई, दि.२८ (प्रतिनिधी) - नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून व्यावसायिक उड्डाणे सुरू करणारी इंडिगो एअरलाइन्स ही पहिली कंपनी ठरणार आहे. विमानतळाचे उद्घाटन ऑगस्टमध्ये होण्याची शक्यता असून पहिली इंडिगोचीच विमाने उडणार आहेत. सुरुवातीला रोज १८ विमानांचे टेकऑफ आणि १८ विमानांचे लॅण्डिंग होणार आहे. नवी मुंबईतून देशातील १५ शहरे हवाईमार्गे जोडली जाणार आहेत. येत्या नोव्हेंबरपर्यंत उड्डाणांची संख्या ७९ पर्यंत वाढणार असून त्यामध्ये १४ आंतरराष्ट्रीय उड्डाणांचा समावेश असेल. या भागीदारीचा करार अदानी एअरपोर्ट होल्डिंग प्रायव्हेट लिमिटेड आणि इंडिगो एअरलाइन्सच्या दरम्यान आज झाला.

अदानी एअरपोर्ट होल्डिंग प्रायव्हेट लिमिटेड आणि इंडिगो एअरलाइन्सच्या वतीने या भागीदारीची घोषणा आज करण्यात आली. विमानतळाचे उद्घाटन झाल्यानंतर इंडिगो एअरलाइन्स या नवी मुंबई विमानतळावरून सर्वप्रथम हवाई सेवा सुरू करणार आहे. सुरुवातीला १८ विमानांचे टेकऑफ आणि १८ विमानांचे लॅण्डिंग होणार आहे. त्यानंतर येत्या नोव्हेंबरपर्यंत विमानांचे टेकऑफ आणि ▪ पान ८

# नवी मुंबई विमानतळावरून ऑगस्टमध्ये पहिले इंडिगोचे विमान उडणार

*(पान १ वरून)* लॅण्डिंगची संख्या सुमारे १४०च्या आसपास जाणार आहे. त्यामध्ये ३० आंतरराष्ट्रीय सेवांचाही समावेश असणार आहे. या भागीदारीचा करार इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स आणि अदानी एअरपोर्ट होल्डिंगचे सीईओ अरुण बन्सल यांच्या उपस्थितीत करण्यात आला आहे.

### *दोन कोटी प्रवासी हाताळणार*

नवी मुंबई विमानतळाचे पहिल्या टप्प्यातील काम सध्या पूर्ण झाले आहे. या पहिल्या टप्प्यात विमानतळाची क्षमता वार्षिक दोन कोटी प्रवासी हाताळण्याची आहे. विमानतळाचे चारही टप्पे पूर्ण झाल्यानंतर प्रवासी हाताळण्याची वार्षिक क्षमता थेट ९ कोटींपर्यंत जाणार आहे. तसेच या विमानतळावरून पहिल्या टप्प्यात ५०० टन मालाची वाहतूक होणार आहे. विमानतळाचा पूर्ण विस्तार झाल्यानंतर मालवाहतुकीची वार्षिक क्षमता ३२ कोटी टनापर्यंत जाणार आहे.

### उड्डाणाची तयारी पूर्ण

१ हजार १६० हेक्टरमध्ये विस्तारलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिल्या टप्प्यातील उड्डाणाची तयारी सध्या पूर्ण करण्यात आली आहे. धावपट्टी, टॅक्सी रनवे यांची कामे पूर्ण झाली आहे. येत्या ७ ऑगस्टपर्यंत विमानतळ टेकऑफ आणि लॅण्डिंगसाठी उपलब्ध नसल्याची नोटीस हवाई प्राधिकरणाने विमान कंपन्या आणि वैमानिकांना दिली आहे. त्यामुळे या विमानतळाचे उद्घाटन ऑगस्टच्या शेवटी किंवा सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात होणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अदानी समूह आणि सिडकोने मात्र विमानतळाच्या उद्घाटनाबाबत अद्याप कोणतीही घोषणा केलेली नाही.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

मुंबई, गुरुवार, २९ मे २०२५ नव शक्ति

# नवी मुंबई विमानतळावरून इंडिगो कंपनी देणार विमानसेवा

**मुंबई** : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्वातंत्र्यदिनी करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. दरम्यान, या पहिल्या टप्प्यात व्यावसायिक उड्डाणे सुरू करणारी इंडिगो ही पहिली एअरलाईन कंपनी असेल, असे एअरलाइन आणि अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड (एएएचएल) यांनी बुधवारी संयुक्त निवेदनात सांगितले.

संमिश्र पानावर



## मोदींच्या हस्ते स्वातंत्र्यदिनी उद्घाटन?

## महत्त्वाचा टप्पा

इंडिगोचे सीईओ पीटर एल्बर्स म्हणाले, इंडिगो ही एनएमआयएवरून काम करणारी पहिली एअरलाइन असेल. हा विस्तार प्रवाशांच्या वाढत्या गरजा आणि भारताच्या विमान वाहतूक क्षेत्राच्या वाढीप्रती आम्ही कटिबद्ध आहोत. एएएचएलचे सीईओ अरुण बन्सल पुढे म्हणाले, इंडिगोसोबतची आमची भागीदारी एनएमआयएला एक प्रमुख विमान वाहतूक केंद्र बनवण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा आहे.

## १४० दैनिक उड्डाणे

इंडिगो पहिल्या दिवसापासून १५ हून अधिक भारतीय शहरांमध्ये दररोज १८ उड्डाणे (३६ हवाई वाहतूक हालचाली) चालवेल. नोव्हेंबर २०२५ पर्यंत १४ आंतरराष्ट्रीय उड्डाणांसह ७९ दैनिक उड्डाणे आणि नोव्हेंबर २०२६ पर्यंत ३० आंतरराष्ट्रीय उड्डाणांसह १४० दैनिक उड्डाणे करण्याची कंपनीची योजना आहे.

## नवी मुंबई विमानतळावरून इंडिगो कंपनी देणार विमानसेवा

### इंडिगोची यशस्वी लँडिंग

११ ऑक्टोबर २०२४ रोजी नवी मुंबई विमानतळावर भारतीय हवाई दलातर्फे ११ ऑक्टोबर २०२४ रोजी इन्स्ट्रूमेन्ट लॅंडिंगची चाचणी आणि २९ डिसेंबरला इंडिगोतर्फे प्रवासी विमानाची यशस्वी लँडिंग चाचणी धावपट्टीवर पार पडली होती. यापूर्वी सोमवारी २४ फेब्रुवारी नागरी विमान वाहतूक महासंचलनालय आणि भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी संपूर्ण दिवस विमानतळाची पाहणी केली होती.

CIDCO
WE MAKE CITIES

सकाळ मुंबई, गुरुवार, २९ मे २०२५

# नवी मुंबई विमानतळावरून इंडिगोची १८ उड्डाणे होणार

## परवानगी मिळवणारी पहिली कंपनी

नवी मुंबई, ता. २८ : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून प्रवासी सेवा देण्यास इंडिगो एअरलाइन्सला परवानगी दिली आहे. त्यानुसार विमानतळ सुरू झाल्यावर पहिल्या दिवसापासून इंडिगो १५ हून अधिक शहरांसाठी १८ पेक्षा अधिक व्यावसायिक उड्डाणे करणार आहे. ही परवानगी मिळवणारी इंडिगो पहिली कंपनी ठरली आहे.

नवी मुंबई विमानतळाचे काम युद्धपातळीवर सुरू असून, लवकरच उद्‌घाटन होणार आहे. नवी मुंबईतून प्रवासी सेवेसाठी व्यावसायिक उड्डाण करण्यासाठी इंडिगोला परवानगी मिळाली आहे. त्यानुसार पहिल्या दिवसापासून १८ पेक्षा अधिक व्यावसायिक उड्डाणे केली जाणार आहेत. नोव्हेंबर २०२५ पर्यंत १४ आंतरराष्ट्रीय उड्डाणांसह दैनंदिन ७९ उड्डाणे, तर नोव्हेंबर २०२६ पर्यंत ही संख्या १४० उड्डाणांपर्यंत वाढवली जाणार आहे.



नवी मुंबईतून उड्डाण करणारी इंडिगो ही पहिली विमान कंपनी असेल. त्यासाठी आमची तयारी पूर्ण झाली आहे. नवी मुंबईतून प्रवाशांना सेवा देण्यासह भारतातील हवाई क्षेत्राला बळकटी देण्यासाठी प्रयत्नशील आहोत.
- पीटर एल्बर्स, सीईओ, इंडिगो

नवी मुंबई विमानतळाहून सुरुवातीच्या टप्प्यात दरवर्षी २० दशलक्ष प्रवासी आणि ०.५ एमएमटी कार्गो हाताळण्यात येणार आहे. हे लक्ष्य पूर्ण झाल्यानंतर ९० दशलक्ष प्रवाशांना आणि दरवर्षी ३.२ एमएमटी कार्गो सेवा देण्याची क्षमता विमानतळावर निर्माण होणार आहे. इंडिगोकडून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय दोन्ही ठिकाणी सेवा देणार आहे. त्यामुळे मुंबई विमानतळावरील गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

लोकमत गुरुवार, दि. २९ मे २०२५

# नवी मुंबई विमानतळावरून भरारीचा पहिला मान इंडिगोला

## अदानी एअरपोर्टशी झाला भागीदारी करार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई/नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व्यावसायिक उड्डाणांसाठी सज्ज झाला आहे. त्यासाठी अदानी एअरपोर्ट होल्डिंग लिमिटेडने इंडिगो या आघाडीच्या विमानसेवा कंपनीबरोबर बुधवारी करार केला. त्यामुळे नवी मुंबई विमानतळावरून व्यावसायिक उड्डाणे सुरू करणारी इंडिगो ही पहिली कंपनी ठरणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे येत्या महिनाभरात उद्घाटन करण्याची योजना आहे. त्याचाच एक भाग म्हणून अदानी एअरपोर्ट होल्डिंग कंपनीने इंडिगो कंपनीबरोबर करार केला आहे. सुरुवातीला दिवसाकाठी इंडिगोच्या १८ विमानांचे उड्डाण होणार आहे. या सेवेमुळे देशातील १५ शहरे जोडली जाणार आहेत.

येत्या नोव्हेंबरपर्यंत इंडिगोच्या विमान उड्डाणांची संख्या प्रतिदिन ७९ करण्यात येणार आहे. त्यांत १४ आंतरराष्ट्रीय उड्डाणांचा समावेश असेल. मार्च २०२६ पर्यंत ही संख्या १०० तर नोव्हेंबर २०२६ पर्यंत १४० विमानांचे उड्डाण अपेक्षित धरले आहे. यात ३० आंतरराष्ट्रीय सेवांचा समावेश असणार आहे.

## ट्रान्सफर हब म्हणून ओळख




भारताच्या विमान वाहतूक क्षेत्राला चालना देण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांनी म्हटले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी ट्रान्सफर हब म्हणून ओळख मिळवून देण्याच्या दृष्टीने हा भागीदारी करार महत्त्वपूर्ण असल्याचे अदानी एअरपोर्ट होल्डिंग लिमिटेडचे सीईओ अरुण बन्सल यांनी सांगितले.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

महाराष्ट्र टाइम्स | मुंबई | गुरुवार, २९ मे २०२५

# विमानोड्डाण दृष्टिपथात

## नवी मुंबई विमानतळाचा शुभारंभ नोव्हेंबरपूर्वी होण्याची चिन्हे

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई/
म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई

**इंडिगो विमानसेवा आणि अदानी एअरपोर्ट होल्डिंग्जकडून उड्डाणांची घोषणा**

**पहिल्या टप्प्यात प्रति दिन १९, तर नोव्हेंबर २०२५पर्यंत ७९ विमानांचे निर्गमन**

**मार्च २०२६पर्यंत प्रति दिन १०० आणि नोव्हेंबर २०२६पर्यंत १४० निर्गमने**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून व्यावसायिक विमानोड्डाणांना लवकरच चालना मिळू शकेल, अशी चिन्हे दिसत आहेत. इंडिगो विमानसेवा आणि अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून व्यावसायिक विमान उड्डाणांची घोषणा बुधवारी केली. त्यामुळे अनेक वर्षे रखडलेल्या या विमानतळावरील विमानोड्डाण दृष्टिपथात आले आहे. त्यामुळे मुंबई विमानतळावरील विमान वाहतुकीला होणारा विलंब आता टाळता येईल, अशी आशा निर्माण झाली आहे.

नवी मुंबईच्या विमानतळाच्या धावपट्टीचे काम पूर्ण झाले आहे. टर्मिनलचे काम ८० टक्के झाल्याचे विमानतळ प्रवर्तकांकडून सांगण्यात येते. मात्र, या विमानतळावरून प्रत्यक्ष उड्डाणांना कधी सुरुवात होणार हे स्पष्ट केले जात नसल्याने प्रवाशांना या माहितीची प्रतीक्षा होती. 'इंडिगो' आणि 'अदानी'ने उड्डाणांची घोषणा करून प्रवाशांच्या आशा पल्लवित केल्या आहेत. या विमानतळावरून इंडिगोची सेवा सुरू होताना पहिल्या टप्प्यात प्रति दिन १९ विमानांचे निर्गमन होईल. इंडिगो पहिल्या टप्प्यात १५ शहरांशी नवी मुंबईतून जोडले जाणार आहे. त्यानंतर नोव्हेंबर २०२५पर्यंत (पान ८वर)

> “या विस्तारीकरणामधून प्रवाशांच्या नवनवीन गरजांची पूर्तता करण्याचा आमचा प्रयत्न आहे. भारतातील झपाट्याने विकसित होत असलेल्या विमान वाहतूक क्षेत्राच्या विकासाप्रती अधिक योगदान देण्याचाही हा प्रयत्न आहे.
>
> – पीटर एल्बर्स, मुख्य कार्यकारी अधिकारी, इंडिगो



> लाखो प्रवाशांसाठी विमान प्रवासाचा अनुभव अधिक सुखद करण्यासाठी, त्यांना सोयीसुविधा आणि अधिक प्रवास पर्याय देण्यास आम्ही सुसज्ज आहोत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी झालेला इंडिगो आणि अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडचा हा सहयोग देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी ट्रान्सफर हब म्हणून या विमानतळाला अधिक बळकटी देईल.
>
> – अरुण बन्सल, मुख्य कार्यकारी अधिकारी, अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड

## विमानोड्डाण दृष्टिपथात

(पान एकवरून)

या सेवेचा विस्तार होऊन प्रति दिन इंडिगोच्या ७९ विमानांचे या विमानतळावरून निर्गमन होणार आहे. यामध्ये १४ आंतरराष्ट्रीय विमानांचाही समावेश असेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. ही सेवा मार्च २०२६पर्यंत प्रति दिन १०० निर्गमने आणि नोव्हेंबर २०२६पर्यंत १४० निर्गमनांपर्यंत विस्तारण्यात येणार आहे. यामध्ये ३० आंतरराष्ट्रीय निर्गमनांचा समावेश असेल. नवी मुंबई विमानतळाच्या या वाढत्या विस्तारामुळे भारतीय हवाई वाहतुकीचे बाजारपेठ जगातील तिसरी मोठी बाजारपेठ म्हणून नावारूपाला येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून दरवर्षी ५ कोटी ४८ लाख प्रवासी वाहतूक होते. नवी मुंबई विमानतळावरून सुरुवातीच्या टप्प्यात दोन कोटी प्रवासी, तर हे विमानतळ पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यानंतर नऊ कोटी प्रवासी प्रतिवर्षी प्रवास करू शकतील. यासोबतच कार्गोसेवेचाही विस्तार होणार आहे. सुरुवातीला पाच लाख मेट्रिक टन कार्गो हाताळण्यात येईल आणि नंतर ३२ लाख मेट्रिक टन कार्गो हाताळणे शक्य होणार आहे. त्यामुळे कार्गोसेवेचा विस्तार झाल्याने कार्गोमध्ये अडकणाऱ्या सामानासाठीही परिस्थिती अधिक सुरळीत होण्याची चिन्हे आहेत.

पूर्वी मुंबई हे हवाई वाहतुकीसाठी मुख्य केंद्र होते. नवी मुंबई विमानतळाला चालना मिळाल्यामुळे मुंबईच्या हवाई वाहतूक क्षेत्रातील हे महत्त्व परत मिळेल, असे हवाई वाहतूक तज्ज्ञ आणि एअर इंडियाचे माजी कार्यकारी संचालक जितेंद्र भार्गव यांनी सांगितले. पूर्वी मुंबई विमानतळावर विमाने उभी करण्यासाठी जागा नसल्याने विमानसेवांवर परिणाम व्हायला लागला होता. मुंबई विमानतळाच्या विस्तारावर निर्बंध होते. इतर शहरांमधील विमानतळे शहरांबाहेर असल्याने विस्तारत गेली. आता नवी मुंबईमुळे जागेअभावी ज्या विमानसेवांवर परिणाम झाला त्यांच्यासाठीही नवीन आशा निर्माण झाल्याचे भार्गव म्हणाले. मुंबईमध्ये उतरणारी विमाने अनेकदा आधीच काही विमाने उतरण्यासाठी रांगेत असल्याने घिरट्या घालतात. यामुळे विलंब होतो. हा विलंबही आता नियंत्रणात येईल आणि मुंबईच्या हवाई वाहतुकीची कार्यक्षमता वाढेल. हा विलंब कमी झाला की त्यामुळे वाया जाणारे इंधनही वाचेल, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

### सद्यस्थिती

- विमानतळाच्या धावपट्टीचे काम पूर्ण
- टर्मिनलचे काम ८० टक्के पूर्ण
- व्यावसायिक विमान वाहतुकीसाठी प्रवाशांच्या सुविधेवर लक्ष
- टर्मिनलचे काम पूर्ण करण्यासाठी १३ हजार कामगार कार्यरत
- व्यापारवाढीच्या संधींसाठी पायाभूत सुविधांची अपेक्षा
- वेगवान कनेक्टिव्हिटीसाठी मोठे रस्ते आणि मेट्रो प्रकल्पांशी जोडणी
- इंडिगोच्या माध्यमातून विमान उड्डाण चाचण्यांना सुरुवात करून इतर विमानसेवांचाही यात आगामी काळात समावेश होईल

CIDCO
WE MAKE CITIES

पुण्यनगरी गुरुवार, २९ मे २०२५ | ठाणे

# नवी मुंबई विमानतळावरून सर्वप्रथम इंडिगोची भरारी

**मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू झाल्याच्या पहिल्या दिवसापासून इंडिगो एअरलाइन या विमानतळावरून १५ हून अधिक शहरांसाठी विमानसेवा सुरू करणार आहे. इंडिगो प्रारंभी दररोज १८ उड्डाणे येथून करणार असून नोव्हेंबरच्या सुरुवातीस उड्डाणांचा आकडा ७९ पर्यंत वाढणार आहे. यातील १४ फ्लाइट या आंतरराष्ट्रीय असतील.

इंडिगो आणि अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड यांनी केलेल्या या घोषणेमुळे नवी मुंबईचा हा विमानतळ पावसाळ्यानंतर कार्यान्वित होण्याचे संकेत मिळाले आहेत. इंडिगोच्यां विमानांचे उड्डाण आणि आगमनही येथून होणार असल्यामुळे प्रत्यक्षात विमान फेऱ्या दुप्पट होणार आहेत. दोन्ही कंपन्यांमधील करारामुळे या विमानतळावरून व्यावसायिक विमान सेवा सुरू करणारी इंडिगो ही पहिली एअरलाईन ठरली आहे.



● नोव्हेंबर २०२६ पर्यंत ३० आंतरराष्ट्रीय उड्डाणे या विमानतळावरून करण्याचा इंडिगोचा मानस आहे, असे इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांनी सांगितले. या सहयोगाबाबत एएचएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल म्हणाले की, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी ट्रान्सफर हब म्हणून हा विमानतळ या सहयोगामुळे अधिक प्रभावी ठरणार आहे.




@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

नवराष्ट्र | ठाणे, २९ मे २०२५

## अदानी इंडिगोमध्ये करार : इंडिगोने गाठला महत्त्वाचा टप्पा

# इंडिगो प्रथमच विमानतळावर

**नवी मुंबई, (वा.)** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लवकरच सुरू होणार आहे. या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून म्हणजेच एनएमआयए येथून पहिल्या दिवसापासून इंडिगो ही पहिली एअरलाइन १५ हून अधिक शहरांमध्ये १८ हून अधिक दैनिक निर्गमने (३६ एटीएम) व्यावसायिक उड्डाणे सुरू करणार आहे. नोव्हेंबर '२५ च्या सुरुवातीपर्यंत ही संख्या ७९ दैनंदिन निर्गमने (१५८ एटीएम) पर्यंत वाढवण्याची शक्यता आहे. यात १४ आंतरराष्ट्रीय निर्गमने समाविष्ट असणार आहेत. नोव्हेंबर '२६ पर्यंत ही संख्या १४० निर्गमने (२८० एटीएम) पर्यंत वाढणार आहे. इंडिगो ही सध्या भारतातील आघाडीची एअरलाइन कंपनी आहे. अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडशी हातमिळवणी केली आहे.अदानी ही भारतातील पीपीपी विमानतळांचे सर्वात मोठे ऑपरेटर आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (एनएमआयए) येथून व्यावसायिक उड्डाणे सुरू करण्याची घोषणा केली.




### अखंड कनेक्टिव्हिटी

एनएमआयए भारताचे प्रमुख आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक केंद्र बनण्यास सज्ज आहे, जे अत्याधुनिक सुविधा, सर्वोत्तम श्रेणीतील प्रवासी अनुभव आणि अखंड कनेक्टिव्हिटी प्रदान करते. त्याच्या धोरणात्मक स्थान आणि प्रगत पायाभूत सुविधांसह, एनएमआयए भारताचे जागतिक हवाई प्रवास नेटवर्क वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात, एनएमआयए दरवर्षी २० दशलक्ष प्रवासी आणि ०.५ एमएमटी कार्गो हाताळण्यास सज्ज आहे.

### एनएमआयएवरून उड्डाण करण्यास वचनबद्ध

या भागीदारीमुळे देशातील विमान वाहतूक वाढीला चालना मिळणार आहे. ज्यामुळे २०३० पर्यंत भारत तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा विमान वाहतूक बाजार बनण्यासाठी एक महत्त्वाचा घटक बनण्याची शक्यता आहे. इंडिगो नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून दररोज १८ उड्डाणे चालवणार आहे. ज्यामुळे व्यावसायिक ऑपरेशन्सच्या सुरुवातीला एनएमआयएवरून उड्डाण करण्यास वचनबद्ध असणारी ही पहिली एअरलाइन बनणार आहे. पहिल्या दिवसापासून १५ हून अधिक शहरांमध्ये १८ दैनंदिन उड्डाणे (३६ हवाई वाहतूक हालचाली (एटीएम)) झाली आहेत, तर नोव्हेंबर '२५ पर्यंत १४ आंतरराष्ट्रीय उड्डाणांसह ७९ दैनंदिन उड्डाणे (१५८ एटीएम) वाढणार आहेत. यामुळे मार्च '२६ पर्यंत १०० हून अधिक दैनिक उड्डाणे (२०० दैनिक एटीएम) होतील.

### दोन्ही बाजूंनी करणार ऑपरेशनल तयारी

इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांनी सांगितले की, "इंडिगो ही एनएमआयएमधून काम करणारी पहिली एअरलाइन असेल आणि आम्हाला हे जाहीर करताना आनंद होत आहे. आमची युती पुढील पावले उचलण्यासाठी दोन्ही बाजूंनी पूर्ण ऑपरेशनल तयारी साध्य करण्याचे संकेत देते, असे ते म्हणाले. या भागीदारीबद्दल भाष्य करताना, एएएचएलचे सीईओ अरुण बन्सल म्हणाले, "एनएमआयएमधून ऑपरेशन सुरू करणारा इंडिगो हा पहिला एअरलाइन भागीदार म्हणून घोषित करताना आम्हाला आनंद होत आहे. ही भागीदारी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी ट्रान्सफर हब म्हणून एनएमआयएचे स्थान निश्चित करण्याच्या दिशेने मोठे पाऊल आहे.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

रायगड टाइम्स गुरुवार, दिनांक २९ मे २०२५

## नवी मुंबई विमानतळावरुन...



# इंडिगो विमान भरणार पहिले उड्डाण!

| रायगड टाइम्स |

मुंबई | नवी मुंबई विमानतळावरुन इंडिगो ही विमान कंपनी लवकरच व्यावसायिक उड्डाणे सुरू करणार आहे. इंडिगो आणि अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड यांच्यात यासंदर्भात करार झाला असून लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या विमानतळाचे उद्घाटन करण्याच्या हालचाली सुरू आहेत.

बुधवारी (२८ मे) इंडिगो आणि अदानी यांनी संयुक्त निवेदन जारी केले. या निवेदनानुसार, अदानी समूहाच्या मालकीने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून व्यावसायिक उड्डाणे सुरू करणारी इंडिगो ही पहिली विमान कंपनी असेल. या भागीदारीमुळे भारत २०३० पर्यंत जगातील तिसऱ्या क्रमांकाची विमान वाहतूक अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल, असे निवेदनात म्हटले आहे. नवी मुंबई विमानतळावरून पहिल्या दिवसापासून १५ हून अधिक शहरांसाठी १८



### पहिल्या दिवसापासून देणार १५ शहरांसाठी सेवा

### इंडिगो आणि अदानी यांचे संयुक्त निवेदन

दैनंदिन उड्डाणे (३६ एअर ट्रॅफिक मॅनेजमेंट) सुरू होणार आहेत. नोव्हेंबर २०२५ पर्यंत ही संख्या वाढून ७९ दैनंदिन उड्डाणांपर्यंत (१५८ एटीएम) पोहोचेल. यात १४ आंतरराष्ट्रीय



उड्डाणांचा समावेश असेल. नोव्हेंबर २०२६ पर्यंत १४० दैनंदिन उड्डाणे होणार असून त्यापैकी ३० आंतरराष्ट्रीय उड्डाणे असतील.

येत्या काळात आणखी काही विमान कंपन्यांसोबत करार होण्याची शक्यता आहे.

इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स म्हणाले, "नवी मुंबई विमानतळावरून उड्डाणे सुरू करणारी इंडिगो पहिली कंपनी असेल याचा आम्हाला आनंद आहे. ही भागीदारी दोन्ही बाजूंनी पूर्ण तयारी दर्शवते. या विस्तारामुळे प्रवाशांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी आमचे समर्पण दिसून येते. नव्या विमानतळावरून सुरू होणारी उड्डाणे प्रवाशांना परवडणारी, वेळेवर आणि त्रासमुक्त सेवा देतील."

अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल म्हणाले, "ही भागीदारी नवी मुंबई विमानतळाला देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी ट्रान्सफर हब म्हणून स्थापित करण्यासाठी महत्त्वाची आहे. आम्ही एकत्रितपणे लाखो प्रवाशांचा प्रवास अनुभव बदलणार आहोत, त्यांना सोपी आणि उत्तम पर्याय उपलब्ध करून देणार आहोत.

### विमानतळाची पहिल्या टप्प्यात क्षमता किती?

पहिल्या टप्प्यात नवी मुंबई विमानतळाची क्षमता दरवर्षी २० दशलक्ष प्रवासी आणि ०.५ दशलक्ष टन मालवाहतूक हाताळण्याची असेल. भविष्यातील विस्तारात ही क्षमता ९० दशलक्ष प्रवासी आणि ३.२ दशलक्ष टन मालवाहतुकीपर्यंत वाढवण्याचे नियोजन आहे. एकूण १,१६० हेक्टरवर पसरलेले हे विमानतळ मुंबईसाठी ड्युअल-एअरपोर्ट सिस्टम आणेल. यामुळे मुंबई विमानतळावरील गर्दी कमी होईल आणि प्रवासी सेवांमध्ये सुधारणा होईल. यात दोन समांतर धावपट्ट्या आणि ३,७०० मीटर लांबीची धावपट्टी आहे, जी मोठ्या व्यावसायिक विमानांना हाताळण्यास सक्षम आहे.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

नवभारत
Thane NaviMumbai plus Edition
May 29, 2025 Page No. 4

# मुंबईकरों का हवाई सफर होगा आसान

## 18 शहरों के लिए रोज़ाना 18 उड़ानें, नवी मुंबई से पहली उड़ान इंडिगो की होगी

### नवंबर 2026 तक 140 उड़ानें होंगी शुरू

■ मुंबई (सं). देश की सबसे बड़ी एयरलाइन इंडिगो और अडानी एयरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेड ने नवी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट से उड़ानों की शुरुआत का ऐलान किया है. यह पहला मौका होगा, जब कोई एयरलाइन नवी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट से कमर्शियल उड़ान शुरू करेगी. इंडिगो शुरुआती दिन से ही रोजाना 18 उड़ानों (36 एयर ट्रैफिक मूवमेंट) के साथ उड़ान भरेगा. इस निर्णय से मुम्बईकरों का सफर आसान हो जायेगा. खासकर नवी मुंबई की तरफ रहने वाले लोगों के लिए. इन उड़ानों के जरिए 15 से अधिक शहरों को जोड़ा जाएगा. इंडिगो की योजना है कि नवंबर 2025 तक उड़ानों की संख्या बढ़ाकर रोज 79 की जाए, जिसमें 14 अंतरराष्ट्रीय उड़ानें भी शामिल होंगी.

### मुंबई को दोहरे एयरपोर्ट सिस्टम का फायदा

मार्च 2026 तक यह संख्या बढ़कर 100 हो जाएगी और नवंबर 2026 तक इंडिगो नवी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट से रोज 140 उड़ानें (280 एयर ट्रैफिक मूवमेंट) संचालित करेगा. इनमें 30 अंतरराष्ट्रीय उड़ानें शामिल होंगी. इंडिगो के सीईओ पीटर एल्बर्स ने कहा, "हम नवी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट से उड़ान भरने वाली पहली एयरलाइन बनकर गौरवान्वित हैं. यह साझेदारी दिखाती है कि दोनों पक्ष ऑपरेशनल रूप से तैयार हैं. नवी मुंबई से उड़ानों की शुरुआत यात्रियों को एक नया, सुलभ और समय पर यात्रा अनुभव देगी."

अडानी एयरपोर्ट्स के सीईओ अरुण बंसल ने कहा, "इंडिगो के साथ यह साझेदारी नवी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट को घरेलू और अंतरराष्ट्रीय यात्रियों के लिए ट्रांजिट हब बनाएगी. मुंबई को अब दोहरे एयरपोर्ट सिस्टम का फायदा मिलेगा, जिससे भीड़ कम होगी और यात्रियों को बेहतर सुविधा मिलेगी. नवी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट को आधुनिक सुविधाओं के साथ भारत का प्रमुख अंतरराष्ट्रीय हवाई अड्डा बनाने की योजना है. पहले चरण में यह एयरपोर्ट हर साल 2 करोड़ यात्रियों और 0.5 मिलियन मीट्रिक टन माल को संभाल सकेगा.




### उड़ानों की विस्तार योजना

| समय | दैनिक उड़ानें | एयर ट्रैफिक मूवमेंट | अंतरराष्ट्रीय उड़ानें |
|---|---|---|---|
| शुरुआत | 18 | 36 | 0 |
| नवंबर 2025 | 79 | 158 | 14 |
| मार्च 2026 | 100 | 200 | – |
| नवंबर 2026 | 140 | 280 | 30 |

### नवी मुंबई से अन्य शहरों को जोड़ने का प्रयास

पूरे निर्माण के बाद इसकी क्षमता 9 करोड़ यात्रियों और 3.2 एमएमटी माल की होगी. इंडिगो ने बताया कि वह देशभर के अधिकतर हिस्सों को नवी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट से जोड़ने की दिशा में काम कर रहा है, ताकि अधिक से अधिक आबादी को कनेक्टिविटी मिले. नई उड़ानों से यात्रियों को सस्ती, समय पर और सुविधाजनक सेवा मिलेगी. मुंबई जैसे व्यस्त शहर में नवी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट के आने से छत्रपति शिवाजी महाराज अंतरराष्ट्रीय एयरपोर्ट पर भीड़ कम होगी और यात्रियों को बेहतर विकल्प मिलेगा. यह साझेदारी मुंबई और महाराष्ट्र की अर्थव्यवस्था को भी नई ऊंचाई देगी.

**नवी मुंबई एयरपोर्ट की कुल क्षमता (पूरा होने के बाद)**

यात्री क्षमता: 9 करोड़/वर्ष

कार्गो: 3.2 मिलियन मीट्रिक टन/वर्ष

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

MUMBAI
THURSDAY
MAY 29, 2025

**Hindustan Times**

# IndiGo to be first airline operating out of NMIA

**Yogesh Naik**

yogesh.naik@hindustantimes.com

**MUMBAI:** IndiGo and Adani Airport Holdings Limited (AAHL) announced the commencement of commercial flights from Navi Mumbai International Airport (NMIA), which will open later this year. IndiGo will be the first airline to operate from the new airport. In December last year, IndiGo conducted a trial flight test at the airport.

With 18 daily departures and 36 Air Traffic Movements (ATMs), the airline will cover 15 cities from day one, according to a press note issued by IndiGo. This will be increased to 79 daily departures (158 ATMs), including 14 international departures, by November 2025 and 100 daily departures (200 ATMS) by March 2026.



**In December last year, IndiGo conducted a trial commercial flight landing on the runway of the new Navi Mumbai International Airport.** BACHCHAN KUMAR/HT PHOTO

By November 2026, it is expected to build up to 140 daily departures (280 ATMs) including 30 international departures.

This partnership will fuel aviation growth in the country, making it a key driver for India to become the third-largest aviation economy by 2030, said a spokesperson.

Pieter Elbers, chief executive officer of IndiGo said, "Our alliance signals towards the achievement of complete operational readiness on both sides to take next steps."

NMIA is set to handle 20 million passengers and 0.5 million metric tonnes of cargo per annum, with the capacity to serve 90 million passengers and 3.2 MMT of cargo per annum, once complete. IndiGo is committed to expanding its reach by offering both domestic and international destinations from NMIA.

Commenting on the partnership, Arun Bansal, CEO of AAHL said, "This partnership marks a major step towards confirming NMIA's position as a transfer hub for domestic and international travellers."

The NMIA has not yet announced the inauguration date but the state plans to invite PM Narendra Modi for it. Earlier, the inauguration of NMIA was slated for June and set to start operations by August 15, but this had been delayed.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

www.freepressjournal.in **nation**
Mumbai, Thursday, May 29, 2025

# IndiGo set for NMIA takeoff

**Dhairya Gajara**
MUMBAI

IndiGo is set to become the first airline to operate from the Navi Mumbai International Airport (NMIA), with tentative operations beginning in the second half of August 2025—a major milestone in expanding the Mumbai Metropolitan Region's aviation capacity.



On Monday, IndiGo signed an agreement with Adani Airport Holdings Ltd (AAHL), officially becoming NMIA's inaugural airline partner. The airline announced it would commence operations with 18 daily domestic departures to over 15 cities from day one, marking the first formal commitment by any carrier to the upcoming airport.

IndiGo plans to rapidly scale operations: from 18 daily flights initially to 79 daily departures—including 14 international routes—by November 2025.

▸ Contd on | nation

## IndiGo set for...

The airline aims to cross 100 daily departures by March 2026 and reach 140 daily flights, including 30 international services, by November 2026.

"We are proud to be the inaugural airline at NMIA," said Pieter Elbers, CEO of IndiGo. "This partnership reflects our shared vision with Adani to transform regional air travel. It's a testament to IndiGo's commitment to connecting more Indians to more destinations with greater ease."

Arun Bansal, CEO of AAHL, added, "Our collaboration with IndiGo is a significant step towards positioning NMIA as a leading domestic and international transfer hub. It underscores our commitment to offering seamless connectivity and a modern travel experience."

In its first phase, NMIA will have the capacity to handle 20 million passengers and 0.5 million metric tonnes (MMT) of cargo annually. Once fully operational, it aims to accommodate 90 million passengers and 3.2 MMT of cargo—significantly easing the load on Mumbai's existing airport.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES




THE INDIAN EXPRESS,
THURSDAY, MAY 29, 2025

# IndiGo to be first carrier to operate from Navi Mumbai airport

**SIDDHANT KONDUSKAR**
MUMBAI, MAY 28

LOW-COST airline IndiGo is set to be the first carrier to launch commercial flights from the Navi Mumbai International Airport (NMIA). In collaboration with Adani Airport Holdings Limited (AAHL), the airline with the largest market share in India, has planned 18 daily flights to more than 15 cities, starting from day one of NMIA operations, with expansion plans in the works.

IndiGo plans to expand operations to 79 daily flights, including 14 international flights, by the end of November 2025. This number is projected to grow to more than 100 daily flights by March 2026 and to 140 daily flights by the end of November 2026, with 30 of those international.

Although the airport has not officially announced an inauguration date, Gautam Adani, chairman of Adani Group, stated during his visit in March 2025 that the airport is expected to be inaugurated by June 2025.

Pieter Elbers, chief executive officer, IndiGo said, "IndiGo will be the inaugural airline to operate from NMIA and we couldn't be more pleased to announce this. Our alliance signals towards achievement of complete operational readiness on both sides to take next steps. This expansion underscores our dedication to catering to the evolving needs of our aspirational travellers and further contributing to the growth of India's booming aviation sector."

Arun Bansal, CEO, AAHL, said, "We are delighted to announce IndiGo as the first airline partner to commence operations from NMIA."

CIDCO
WE MAKE CITIES

THE TIMES OF INDIA, MUMBAI | THURSDAY, MAY 29, 2025

# ‘By Nov, IndiGo to have 14 int’l departures from new airport’

Times News Network

**Mumbai:** IndiGo on Tuesday said its flight will be the first to operate from Navi Mumbai International Airport (NMIA). Arun Bansal, CEO, Adani Airport Holdings Ltd (AAHL), said, "This partnership (with IndiGo) marks a major step towards confirming NMIA's position as a transfer hub for domestic and international travellers."

By Nov, IndiGo will increase its flight frequency to 79 daily departures (158 flights per day, including arrivals). These will include 14 international departures, the airline said. By March 2026, the airline will scale up its operations to over 100 daily departures, and by Nov next year, the operations will be further built up to 140 daily departures (280 arrivals and departures per day), including 30 international departures, the companies said. Other airlines are expected to make similar announcements in the coming months.

Meanwhile, Mumbai airport, which handles about 920 flights a day, will continue to handle both domestic and international flights. A few months from now, when ticket booking for flights operated to and from Navi Mumbai airport opens, passengers will get to choose between the two airports.

In its initial phase, NMIA is set to handle 20 million passengers and 0.5 MMT (million tons) of cargo per annum, with the capacity to serve 90 million passengers and 3.2 MMT of cargo per annum once complete. "The launch of NMIA will create a dual-airport system for the financial capital of the country, enabling the de-congestion of Mumbai airport and enhancing the overall passenger experience. The augmented capacity offered by both airports will offer unparalleled economic growth for the Mumbai region and Maharashtra," said the airport.

Last December, NMIA announced April 17 as the date for formal inauguration, with domestic flights to commence a month later around mid-May. Currently, a notice issued by the country's air navigation provider, the Airports Authority of India (AAI), states that the Navi Mumbai airport runway will remain non-functional till Aug 6. Sources said another notice extending the closure by a few more months is likely to be issued in Aug.

## AIRPORT'S OPENING CAPACITY: 55K FLYERS A DAY



**NAVI MUMBAI AIRPORT**
TERMINAL CAPACITIES & TIMELINE

**TERMINAL 1 (T1)**
Passengers per annum declared capacity
20 MILLION
55,000 passengers per day, roughly
**SATURATION**
- Expected by end of 2026
- Fastest saturation for a greenfield airport terminal in the world

**TERMINAL 2 (T2)**
30 MILLION
Expected operational by 2029



**INTERIM EXPANSION** (2026–2029):
Mumbai Airport T2 and Navi Mumbai T1 to be expanded
AIM | To handle traffic beyond declared capacities

**OVERALL PROJECT SCOPE**
TOTAL AREA
1,160 hectares
(2,866 acres)
RUNWAYS
2 parallel runways
90 million
Ultimate handling capacity in terms of passengers per annum

**NEW AIRPORT'S READINESS**
- Feb: Mock check-in conducted
- Dummy boarding passes and baggage tags issued
- Assessment by DGCA and AAI officials

**WHAT IT MEANS FOR FLYERS**
Passengers can choose between
BOM — **Chhatrapati Shivaji Maharaj International Airport** (existing)
NMI — **Navi Mumbai International Airport** (upcoming)

**Similar model is Goa, where flyers choose between:**
GOI: Dabolim Airport
GOX: Mopa Airport

CURRENT BOOKING STATUS IN MMR:
**ONLY BOM AVAILABLE FOR BOOKING**

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

आपल्या वाटण्या, आपल्या वाटण्या...
आपलं महानगर
Palghar Edition
May 29, 2025 Page No. 1

# नवी मुंबई विमानतळावरून पहिले उड्डाण इंडिगोचे

## अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज, इंडिगोमध्ये करार



प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा

**नवी मुंबई :** ग्रीन फिल्ड नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ केव्हा सुरू होणार याची उत्सुकता ताणली गेलेली असतानाच अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज आणि इंडिगोमध्ये यांच्यातील करारामुळे लवकरच विमानतळ सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नवी मुंबई विमानतळावरून पहिले टेकऑफ करणारे विमान इंडिगोचे असून पहिल्याच दिवशी तब्बल १५ शहरांसाठी १८ विमाने उडणार आहेत.

सिडको महामंडळ आणि अदानी उद्योग समूह विकसित करत असलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज आणि इंडिगो यांच्यात बुधवारी (२८ मे) झालेल्या करारानंतर नवी मुंबई विमानतळ लवकरच उड्डाणासाठी सज्ज होणार असल्याची माहिती करारानंतर देण्यात आली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची चाचणी ११ ऑक्टोबर आणि २९ डिसेंबर २०२४ रोजी यशस्वी झाली होती. ११ ऑक्टोबरला हवाईदलाचे विमान आणि २९ डिसेंबर रोजी इंडिगोचे प्रवासी विमान लँड झाले होते. त्याचवेळी मे महिन्यामध्ये विमानतळ सेवेत येईल, असे सांगण्यात आले होते. मात्र, गौतम अदानी यांनी पाहणी केल्यानंतर जूनमध्ये विमानतळ सुरू होईल, असे संकेत देण्यात आले होते.

“ इंडिगोसोबत अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडने (एएएचएल) भागीदारी करीत विमानसेवेसाठी करार करून यशस्वी पाऊल टाकले आहे. नवी मुंबई विमानतळाला एक प्रमुख विमान वाहतूक केंद्र बनवण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा आम्ही गाठला आहे.- **अरुण बन्सल,** सीईओ-एएएचएल

“ इंडिगोच्या माध्यमातून नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवरुन पहिली विमानसेवा सुरू होणार आहे, याचा आम्हाला आनंद होत असून प्रवाशांच्या वाढत्या गरजा त्याबरोबरच भारताच्या विमान वाहतूक क्षेत्राला इंडिगो आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक गतिमान करणार आहे.
-**पीटर एल्बर्स,** सीईओ-इंडिगो

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd